माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल केलेली तक्रार**

## क्र.मुमाआ/नों.क्र.११९५/२४/त.क्र.४३/२५

श्री.सुरेश रामजी साईल

**विरुद्ध**

जन माहिती अधिकारी
नॅशनल सोसायटी फॉर इक्वल ॲपॉरच्युनिटीज फॉर दि हॅन्डिकॅप इंडिया
(नासिओ) पोस्टल कॉलनी रोड, चेंबूर, मुंबई-४०० ०७१.

प्रथम अपिलीय अधिकारी
नॅशनल सोसायटी फॉर इक्वल ॲपॉरच्युनिटीज फॉर दि हॅन्डिकॅप इंडिया
(नासिओ) पोस्टल कॉलनी रोड, चेंबूर, मुंबई-४०० ०७१.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २३.०९.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर तक्रारीवर आज दि.२३.०९.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान तक्रारदार उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणी तक्रारदार श्री.सुरेश साईल यांनी अपिल क्र.४८६२/२४ यात दि.२६.०८.२०२४ रोजी पारित आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचे आक्षेप नोंदवित प्रस्तुत तक्रार अर्ज दाखल केलेला आहे.

या प्रकरणी उपरोक्त आदेशाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी नॅशनल सोसायटी फॉर इक्वल ॲपॉरच्युनिटीज फॉर द हॅन्डीकॅप इंडिया NASEOH या संस्थेस नियमाप्रमाणे सेवापुस्तिकेची मागणी केली होती. उपरोक्त संस्थेने त्यांना माहिती अधिकार लागू होत नसल्याबाबत तसेच संबंधित संस्थेत शासकीय कार्यालयांप्रमाणे सेवापुस्तिका उपलब्ध नसून केवळ तेथे कार्यरत कर्मचाऱ्यांची ढोबळ स्वरुपाची माहिती जी संबंधित संस्थेत उपलब्ध असल्याप्रमाणे अपिलार्थी यांना या आधीच पुरविण्यात आली असल्याचे आढळून येते.

तथापि, सुनावणीच्या वेळेला संबंधित संस्थेचे प्रतिनिधी श्री.योगेश शेट्टी यांनी अपिलार्थी यांनी नियमाप्रमाणे सेवापुस्तिकेची मागणी केल्यावर त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल असे नमूद केले.

Jyotsna

तथापि, आयोगाने यावर कुठलाच आदेश पारित केला असल्याचे प्रथम दर्शनी आढळून येत नाही. अपिल निकाली काढण्यात आले आहे. त्यावर प्रस्तुत प्रकरणी दाखल केलेला तक्रार अर्ज हा प्राथमिक दृष्टया कलम १८ (१) अन्वये दाखल करणे योग्य ठरणार नाही तसेच त्यावर कुठलाही आदेश देखिल पारित करणे हे कायद्याला धरुन होणार नाही. तथापि, उपरोक्त आदेश हा संस्थेच्या प्रतिनिधींनी श्री.साईल यांना अर्ज केल्यानंतर त्यांना उपलब्ध असलेल्या सेवापुस्तिकेची माहिती देण्यात येईल असे आश्वासित केले होते व त्याप्रमाणे श्री.साईल यांनी संबंधित संस्थेकडे अर्ज देखिल दाखल केला होता. संस्थेच्या वतीने अपिलार्थींना पुरविण्यात आलेल्या कागदपत्रात पृष्ठ क्र.१४ ते ३१, ३६, ३९ व ४१ नसल्याबाबत आक्षेप नोंदविला असून दिलेल्या आश्वासनाची पूर्तता झालेली नाही असे नमूद केले आहे. तरी संस्थेने त्यांच्याकडे असलेल्या अपिलार्थी श्री.साईल यांच्या सेवापुस्तिकेतील वरील सर्व कागदपत्रांची आणि दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्याच्या निर्देशासह तक्रार अर्ज निकाली काढून नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२. वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २३.०९.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission Maharashtra

Jyotsna